# प्रकरण चौथे

## फलटण तालुक्यातील पक्षीय राजकारण एक:टीकात्मक अभ्यास

### स्थानिक राजकारणाचे स्वरूप, गटबाजी आणि स्थानिक सत्ता-केंद्रांचे महत्त्व -

भारतीय स्थानिक राजकारणाचे स्वरूप स्पष्ट करताना हे स्पष्ट होते की, स्वातंत्र्योत्तर काळापासून ते १९६७ पर्यन्त केंद्र व राज्य पातळीवर काँग्रेसपक्ष प्रभावी होता. स्थानिक पातळी-वरही काँग्रेस पक्षाचाच प्रभाव होता. १९६२ पासून महाराष्ट्रात पंचायत राज्य संस्थांचा प्रयोग सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी सुरु झाला. विविध सहकारी संस्था, पंचायत समित्या, ग्रामपंचायती जिल्हा परिषदा यातून नवे ग्रामीण नेतृत्व पुढे येऊ लागले. या माध्यमांच्या द्वारे नवीन नेतृत्वाचा विकास होऊ लागला.

वर उल्लेखलेल्या संस्थांमधून स्थानिक पातळीवरील सत्ताकेंद्राची निर्मिती झाली. या सत्ताकेंद्रा मधून पुढे येणारे पुढारी स्वतः:च्या ताब्यात (गटाच्या ताब्यात) जास्तीत जास्त सत्तास्थाने ठेवण्याचा प्रयत्न करु लागले. यातूनच त्यांच्या परस्परातील स्पर्धा सुरु झाल्या. या स्पर्धेतूनच आपला प्रभाव कायम ठेवण्यासाठी राजकीय पक्ष, तत्त्वे, ध्येय-धोरण इत्यादी गोष्टींना गौण स्थान प्राप्त झाले. गटाच्या ताब्यात असणा-या सत्तास्थानांवरून त्या राजकीय गटाची राज-कारणातील किंमत कमी जास्त ठरु लागली. यातूनच गटबाजी ,

वैयक्तिक हेवे-दावे यांच्यासाठी राजकीय सत्तास्थानांचा उपयोग केला जाऊ लागला.[१]

वरील प्रकारच्या परिस्थितीमुळे लोकशाहीच्या विकासासाठी सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या उद्देशाने निर्माण केलेली सत्तास्थाने ही स्थानिक व्यक्तींच्या, व्यक्ती गटांच्या परस्पर मान-अपमान, स्पर्धा यांच्यासाठी वापरावयाची साधने बनली. विकेंद्रीकरणांतर्गत निर्माण केलेल्या संस्था ह्या स्थानिक गटाच्या राजकारणाचे अड्डे बनल्या. ही सत्तास्थाने स्वत:च्या गटाच्या ताब्यात ठेवण्याची राजकारण खेळले जाऊ लागले. नागरिकांच्या मतांना, त्यांच्या सुखसोयींना गौणत्व प्राप्त झाले आणि गट किंवा व्यक्ती यांच्या सोयी, सवलतींचा विचार होऊ लागला. ही परिस्थिती केवळ स्थानिक पातळीवरच निर्माण झाली असे नाही तर केंद्र पातळीपासून पक्षांतर्गत गट, गट राजकारण व व्यक्तीगट या सर्वांनीच मतांसाठी सत्तेचा उपयोग करण्याचे कार्य सुरु केले. व्यक्तिगत मतभेदाच्या पायावर व्यक्तिगट गट निर्मिती व पक्ष निर्मिती झाली. राजकीय पक्ष, पक्षांतर्गत गट, गटांची परस्परांमधील स्पर्धा व त्याद्वारे राजकारणातील घटनांना मिळालेल्या व दिलेल्या कलाटण्या हे सर्व दुवे परस्परांमध्ये अडकलेले दिसतात.

स्थानिक राजकारणात सत्ताकेंद्रे महत्त्वाची होती कारण त्या केंद्राच्या साह्याने प्रत्येक पुढारी आपला राजकीय प्रभाव जास्तीत जास्त वाढवीत होता. राज्यस्तरावरील नेतृत्व अशा प्रकारच्या गटबाजीस प्रोत्साहन देत होते. कारण या गटाच्या साह्याने राजकारणाच्या सर्व क्षेत्रात प्रवेश करावयास वाव गटबाजीमुळे राज्यस्तरावरील नेतृत्वास मिळत होता. थोडक्यात,

सांगायचे झाले तर स्थानिक राजकारणातील गटबाजीस आपल्या अविकसित लोकशाहीमुळे खतपाणी मिळाले.[२]

फलटणचे राजकारण व गटबाजी -

फलटणचे राजकारण हे काही प्रभावी व्यक्ती व त्यांना साहाय्य करणारे इतर पुढारी व त्यांचे गट यांच्या भोवती फिरताना दिसते.

मालोजीराजे हे फलटण संस्थानचे शेवटचे संस्थानिक. त्यांचा फलटणच्या राजकारणावर १९६२ च्या विधानसभेच्या निवडणुकीच्या काळापर्यन्त प्रभाव दिसतो. अपवाद फक्त संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळाचा होय. १९६७ च्या विधानसभेसाठी मात्र मालोजीराजे यांच्या मुलाला (शिवाजीराजे) यांना कॉंग्रेस पक्षाने तिकीट दिले नाही. कॉंग्रेस पक्षाचे तिकीट पंचायत समिती व जिल्हा परिषदा यातून ज्यांचे नेतृत्व उदयाला आले त्या डॉ.भोईटे यांना मिळाले. स्वत:च्या मुलाला पक्षाने तिकीट नाकारताच राजे गटाची पक्षनिष्ठा संपुष्टात आली. नंतर लगेचच मालोजीराजे यांचे पुत्र शिवाजीराजे हे अपक्ष म्हणून याच निवडणुकीत उभे राहिले. म्हणजेच केवळ पक्षाने तिकीट नाकारताच, पक्ष सदस्यांनी अपक्ष होऊन, विरोधक म्हणून उभे राहण्याची तयारी राजेगटाने दाखविली. कारण सत्तेशिवाय गट कायम राहात नाही. व टिकत नाही हे मालोजीराजांना माहित होते.

१९६७ व १९७२ या दोनही विधानसभा निवडणुकीच्या वेळी फलटण तालुक्यात डॉ. भोईटे यशस्वी ठरले. त्यांचा प्रतिस्पर्धी राजेगट मात्र बराच निष्प्रभ होता. श्री.स.साखर

कारखाना हे सत्तास्थान वगळता इतर सर्व सत्तास्थाने भोईटे गटाच्या ताब्यात होती. कारखाना मात्र १९७९ पर्यन्त राजे गटाच्या ताब्यात होता.

१९७७ च्या विधानसभा निवडणुकीसाठी कॉंग्रेस पक्षाने डॉ. भोईटे यांना तिकीट दिले नाही तर ते तिकीट चिमणराव कदम या नवीन नेतृत्वाला दिले. चिमणराव कदम हे पंचायत समिती व जिल्हा परिषदा यांच्या नंतर विधानसभा निवडणुकीला उभे राहिले होते. डॉ. भोईटे यांनी पक्षाने तिकीट नाकारताच पक्ष त्याग केला. आतापर्यन्तच्या राजकारणात राजे गट व भोईटे गट यांच्यात स्पर्धा होती. परंतु कदम गट स्पर्धेमध्ये येताच भोईटे गटाने राजे गटाबरोबर हातमिळविणी केली. त्यामुळे जनता पक्षाचे उमेदवार शिवाजी राजे हे विधान सभेवर निवडून गेले. अर्थात राजेगट व भोईटे गट यांची ही युती १९७९ च्या श्रीराम सहकारी साखर कारखान्याची निवडणुक होईपर्यन्तच टिकली. कारखान्याच्या चेअरमन पदाच्या निवडणुकीमध्ये भोईटे गटाचा प्रभाव पडला आणि राजे गटाने लगेच भोईटे गटाबरोबरची युती संपविली. १९७९ नंतर राजे गट व कदम गट एकत्र पणे निवडणुका लढवताना दिसतात.

१९८० च्या विधानसभा निवडणुकीच्यावेळी कॉंग्रेसपक्षाचे (एस) तिकीट चिमणराव कदम यांना मिळाले व कदम गट यशस्वी ठरला. भोईटे गटाने १९७७ मध्ये अपक्ष म्हणून राहण्याचे धोरण स्वीकारले. परंतु १९७९ साली त्यांनी परत इंदिरा कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. तरीही त्यांना या निवडणुकीत (आय) कॉंग्रेस पक्षाचे तिकीट मिळाले नाही. या निवडणुकीनंतर डॉ. भोईटे व सहका-यांचा

असणारा भोईटे गट आणि राजेगट हे दोन्हीही इंदिरा कॉंग्रेस पक्षात आले.

१९८५ च्या विधानसभेला श्री. चिमणराव कदम यांना तिकीट नाकारले गेले, तेव्हा श्री. कदम हे अपक्ष म्हणून निवडून आले.

वरील प्रकारे फलटणच्या राजकारणात गट आणि गट-राजकारण असल्याचे दिसते. प्रतिस्पर्धी गटावर मात करण्यासाठी येथील गट शत्रुत्व असणाऱ्या गटाशी हात मिळवणी करताना दिसतात. पक्षाने निवडणुक तिकीट नाकारताच पक्षत्याग करणे वा दुसऱ्या राजकीय पक्षात प्रवेश करणे इ. गोष्टी घडल्याचे दिसून येते. सत्ता आणि सत्ताकेंद्र आपल्या हातात ठेऊन राजकीय स्थान टिकविण्याची धडपड या गटामध्ये आहे.

फलटणचे राजकारण व साताराचे राजकारण -

सातारा जिल्ह्याच्या राजकारणाचा प्रभाव फलटण तालुक्याच्या राजकारणावर पडलेला दिसतो. १९५२ पर्यन्त सातारा जिल्ह्यावर कॉंग्रेसपक्षाची चांगली पकड होती. १९५७ च्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात कॉंग्रेसांतर्गत यशवंतराव चव्हाण व त्यांचे सहकारी यांचा एक गट आणि शे.का.पक्ष आणि इतर विरोधी पक्ष यांचा एक गट तयार झाला. यावेळीच राज्यपातळीवरील गटांच्या राजकारणाला स्पष्ट स्वरूप मिळाले. यशवंतराव चव्हाणांनी केंद्रातील राजकारणाचा व लोकांचा कल पाहून सत्तेच्या दिशेने योग्यरितीने हालचाल केली आणि संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद मिळविले.

वरील घटनेच्या काळात फलटणचे मालोजीराजे नाईक - निंबाळकर हे यशवंतराव चव्हाणांच्या बरोबर होते• १९६० नंतर महाराष्ट्रात पंचायत राज्याचा प्रयोग सुरू केला• यशवंतरावांनी हाती असलेल्या सत्तेचा वापर करून स्वत:चा राजकीय पाया भक्कम करण्यासाठी नव्याने निर्माण झालेली सत्तास्थाने आपल्या गटातील व्यक्तींना वाटली• ती सत्तास्थाने ताब्यात ठेऊन त्याद्वारे येथील राजकारणात राजकीय वर्चस्व निर्माण केले• जनता पक्षाच्या राजवटीपर्यन्त (१९७७) यशवंतराव चव्हाण यांचा सातारा जिल्ह्याच्या राजकारणावरील प्रभाव अंतर्गत विरोध सहन करूनही, बराचसा टिकलेला दिसतो• परंतु १९७७ च्या लोकसभेमध्ये सातारा मतदार संघातून कॉंग्रेस पक्ष यशस्वी ठरला, पण राज्य पातळीवर मात्र जनतापक्षाची व विरोधी पक्षाची युती यशस्वी ठरली• यशवंतराव चव्हाण विरोधी पक्ष नेते झाले• त्यांचे सातारा जिल्ह्यावर वर्चस्व कायम असले तरी जनता पक्षाने बाळासोहेब देसाई, अभयसिंह राजे व शिवाजीराजे यांच्या मदतीने काही जागा मिळविल्या• पुढे प्रेमलाबाई चव्हाण व यशवंतराव मोहिते यांनी वसंतदादांच्या मदतीने १९८० साली यशवंतरावांच्या नेतृत्वास मोठा शह दिला पण ते अयशस्वी ठरले•

फलटणच्या राजकारणात १९७७ नंतर राजेगटाने जनता पक्षात प्रवेश केला• कॉंग्रेस ( स्व ) मध्ये कदम गटाने प्रवेश केला आणि डॉ• भोईटे काही काळ कुंपणावर राहिले आणि शेवटी इंदिरा गट कॉंग्रेसमध्ये सामील झाले• चव्हाण गटाचा साताऱ्याच्या राजकारणावर वरचष्मा राहिला आणि कदम यांनी त्यास मोठा आधार दिला• वाई, कराड, जावळी, सातारा इत्यादी मतदार संघा-

सारखे अनिर्बंध वर्चस्व यशवंतराव चव्हाण फलटणवर कधीच प्रस्थापीत करू शकले नाहीत, कारण खटाव व पाटण प्रमाणेच हा मतदार संघ तसा त्यांच्या पूर्ण प्रभाव क्षेत्राच्या बाहेरचा होता. म्हणूनच १९८० साली शालिनी ताईंनी या मतदारसंघात त्यांच्या विरूद्ध १00 मतेजास्त मिळविली. पण तरीही चव्हाण यांनी आधी डॉ.भोईटे व नंतर कदम यांच्या साहयाने या मतदारसंघाच्या राजकारणावर आपला प्रभाव कायम ठेवला होता.

## गटबाजी व पक्षीय राजकारण -

केंद्र व राज्य पातळीवर बहुश: काळ कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव होता. म्हणून फलटणच्या राजकारणातही कॉंग्रेसपक्षाचा प्रभाव दिसतो. फलटणच्या राजकारणातील गटबाजी ही पक्षांतर्गत होती.

पण १९७७ साली केंद्रात कॉंग्रेसच्या पराभव झाला आणि जनता पक्ष सत्तेवर आला. त्याबरोबर विरोधी गटांनी (उदा. राजेगट) कॉंग्रेसचा त्याग केला व जनता पक्षात ते सामील झाले. पुढे कॉंग्रेसचे विभाजन झाल्यानंतर कदम गट यशवंतरावांच्या बरोबर तर भोईटे गट इंदिरा कॉंग्रेसबरोबर गेलेला दिसतो. १९८० नंतर पुन्हा कॉंग्रेसचे एकछत्री नेतृत्व प्रस्थापित होताच हे तीनही गट इं. कॉंग्रेस पक्षात सामील झालेले दिसतात. पण खर्डेकर मात्र शरद पवारांच्याबरोबर समाजवादी कॉंग्रेस पक्षात राहिले. परवा ते पुन्हा मुख्य पक्षात आले. याचाच अर्थ असा की, केंद्र व राज्यस्तरावर जर एक पक्ष सत्तास्थानी असेल तर हे गट त्या पक्षात जावून गट बाजीचे राजकारण करतात.

स्थानिक राजकारण व पंचायत समिती -

फलटणच्या राजकारणात पंचायत समिती, ग्रामपंचायत, जिल्हा परिषदा इ. संस्थांना महत्त्वाचे स्थान दिसते. १९६२ नंतर सुरु झालेल्या पंचायत राज्याच्या प्रयोगातून स्थानिक पातळीवर जी विविध सत्तास्थाने निर्माण झाली ती स्थानिक राजकारणात महत्त्वाची ठरली. ग्रामपंचायतींमधून त्या-त्या गावातील राजकीय नेतृत्व आकार घेऊ लागले. नवनव्या व्यक्ती राजकारणात सहभागी होऊ लागल्या.

१९६७ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणूकीत फलटण तालुक्यातून पंचायत समितीच्याद्वारे पुढे आलेल्या नेतृत्वाने प्रस्थापित नेतृत्वाला शह दिला. अशाप्रकारच्या नेतृत्वाला स्थानिक संस्थानमधून विकसीत झालेले डॉ. भोईटे यांचे नेतृत्व प्रभावी ठरले. १९६७ व १९७२ या दोन्ही विधानसभा निवडणूकीच्या वेळी डॉ. भोईटे प्रभावी ठरले. पुढे याच पंचायत समितीत केलेल्या कामा च्या जोराने चिमणराव कदम यांचे नेतृत्व पुढे आलेले दिसते. ग्रामपंचायती व पंचायत समिती यांच्याद्वारा आपली राजकीय पाळेमुळे बळकट करणे निरनिराळ्या राजकीय पुढा-यांना शक्य होते.

स्थानिक राजकारण व सहकारी साखर कारखाना -

श्रीराम सहकारी साखर कारखाना बरीच वर्षे म्हणजे जवळ जवळ २५ वर्षे राजे गटाकडे होता व त्याच्या आधारावरच राजे गट राजकारणात पाय टिकवून होता पण १९७९ साली श्री. भोईटे यांच्या गटाने साखर कारखाना आपल्या ताब्यात घेतला व परवा-परवा पर्यंत

तो त्यांच्या ताब्यात होता. भोईटे गटाच्या हाती कारखाना असूनही एकूण राजकारणावर त्यांचा पूर्वी सारखा प्रभाव राहिला नाही. याचा अर्थ असा की फलटणच्या राजकारणात श्री राम सहकारी साखर कारखाना निर्णायक भूमिका बजावू शकलेला नाही. कारण ज्यांच्याजवळ कारखान्याची सूत्रे होती त्यांना इतरत्र अलग पाडण्यात त्यांचे विरोधक यशस्वी ठरलेले दिसतात. इतर तालुक्यात मात्र हे चित्र दिसत नाही.

स्थानिक राजकारण गटबाजी आणि राजकारण विकास -

पंचायत राज्याच्या प्रयोगापासून स्थानिक पातळीवरील लोकांचा राजकारणातील सहभाग वाढला. परंतु त्यातही सत्ता टिकविण्यासाठी गट आणि सत्ता राजकारण सुरु झाले. गट-गटांमध्ये स्पर्धा निर्माण झाल्या. या गटांच्या परस्पर संबंधामुळे प्रत्येक गट स्वत:चा प्रभाव टिकविण्यासाठी काही कार्य करु लागले. विविध योजना प्रकल्प यांचा पाठपुरावा करुन जनतेवरची आपली पकड कायम ठेवून राजकारणातील स्थान टिकवू लागले. हाती असलेल्या सत्तेचा वापर गटराजकारणात काही ठराविक व्यक्तींना होत असला तरीही गटांच्या परस्पर स्पर्धेमुळे सामान्य लोकांसाठी काही कामे करणे गटांना अपरिहार्य ठरले.

फलटणच्या राजकारणात असे दिसते की, राजेगट, भोईटेगट, कदमगट, हे पंचायती राज्याच्या विविध संस्थांवर पकड ठेऊन होते. ही पकड कायम ठेवण्यासाठी त्या गटांनी लोकांसाठी केलेल्या कार्याच्या ताकदीचा बराचसा उपयोग झाला.

लोकशाहीतील पंचायती राज्य हा सत्ता विकेंद्रीकरणाचा प्रयोग बराचसा यशस्वी ठरलेला दिसतो. त्यातून निर्माण झालेले गट व नेते यांची स्वार्थावर आधारीत राजकारणातीलवृत्ती व निवडणूक लढविण्याचे तंत्र, मंत्र यांचा प्रतिकुल परिणाम राजकारणावर झालेला दिसतो. तरीही निर्माण झालेले हे दोष त्या संस्थाचे नसून त्यांमध्ये कार्यरत असणाऱ्या व्यक्ती, व्यक्तीचे गुण दोष यातून निर्माण झालेले आहेत असे म्हणता येते.

प्रा. बाविस्कर यांच्या मते, या गटबाजीमुळे विकासाचे राजकारण तालुक्यात सुरू होते.[३] याउलट श्री. शिवाजीराजे, डॉ. भोईटे व श्री.कदम यांची याबाबत वेगवेगळी मते आहेत. श्री. शिवाजीराजे नाईक - निंबाळकर यांच्या मते, गटराजकारणामुळे एखाधा गटाचा फायदा होतो परंतु त्यासाठी इतर गटाचे नुकसानही केले जाते. म्हणजेच गट राजकारणाचा फायदा समाजाला होत नाही म्हणून राजकीय विकास म्हणजे सामाजिक विकास म्हणता येत नाही.[४] याच मताला अनुसरून असणारे मत डॉ. कृष्णचंद्र भोईटे प्रगट करतात. डॉ.भोईटे यांच्यामते, गटबाजीद्वारे राजकीय विकास होतो असे म्हणणे योग्य होत नाही, गटबाजीद्वारे राजकारण पुढे चालले आहे पण ते विकसीत झालेले राजकारण आहे असे म्हणता येत नाही. भोईटे यांच्या उद्गारामध्येच सांगायचे तर, "गटबाजीमुळे राजकारण विकसीत होण्याऐवजी बिघडलेले असते".[५]

वरील प्रकारची मते जरी डॉ. भोईटे व शिवाजीराजे नाईक-निंबाळकर यांनी मांडली असली तरी श्री.चिमणराव कदम यांचे मत मात्र प्रा. बावीस्कर यांच्या मताला पाठींबा देणारे आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्यांच्या मते[1] असे गटागटातील स्पर्धेमुळे आर्थिक व राजकीय विकासास वाव मिळतो. विविध नेत्यांत स्पर्धा निर्माण होते व त्यामुळे जास्त काम होते पण गटातील राजकारणाची स्पर्धा जर टोकाला गेली तर मात्र ती राजकीय स्वास्थ्याला विघातक ठरते.[६]

स्थानिक राजकारण, जिल्हा राजकारण, राज्यस्तरावरील राजकारण व केंद्रीय राजकारण यांचे परस्परांशी जवळचे संबंध आहेत. कारण ही सर्व सत्ताकेंद्रे एकमेकांपासून काही शक्ती अर्जित करतात. श्री.कदम , डॉ. भोईटे, व शिवाजीराजे यांचे मते केंद्र , राज्य व स्थानिक राजकारण यांच्यात संबंध असणे अपरिहार्य आहे.

श्री.कदम यांच्यामते, स्थानिक राजकारणावर जिल्हा व राज्य स्तरावरील राजकारणाचा तसेच केंद्रीय राजकारणाचा निश्चीत परिणाम होतो. गेल्या ५ ते १० वर्षाच्या काळापासून राज्या-राज्याचे निर्णय हे दिल्लीमधून घेतले जातात. याबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना श्री. कदम म्हणतात की, विशेषत: बॅ.अंतुले आल्यानंतर आणि गेल्यानंतर महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याचे बदल केंद्रातूनच जास्त झाले. याचा विपरीत परिणाम राज्यावर झाला. कारण राज्याच्या विकासाला स्थैर्य मिळाले नाही, आणि राज्याचा विकास व्हायचा असेल तर राज्याचे नेतृत्व स्थिर असले पाहिजे.[७]

डॉ.भोईटे हे श्री.कदम यांच्या मताला दुजोरा देतात. डॉ.कृष्णचंद्र भोईटे म्हणतात, " शेवटी स्थानिक राजकारण हे गटबाजीने पोखरलेले असते आणि त्या गटांचे केंद्रात कुठे ना कुठे संबंध पोहचत असतात. यशवंतराव प्रभावी होते तोपर्यन्त

यशवंतरावाचा गट स्थानिक राजकारणात प्रभावी होता. परंतु नंतर काँग्रेसांतर्गत यशवंतरावांच्या विरोधी जे गट असायचे त्यांचे प्रभुत्व वाढायला लागले. त्याचा नाही म्हटले तरी परिणाम होता.[८]

वरील प्रकारे डॉ. भोईटे यांनी स्थानिक गट आणि त्यांचे राजकारण व राज्य पातळीवरील केंद्रपातळीवरील गट व त्यांचे राजकारण यांची साखळी स्पष्ट केली. याबाबत श्री. शिवाजीराजे ना. निंबाळकर आपले मत मांडताना म्हणतात की, " स्थानिक राजकारणावर राज्य स्तरिय राजकीय बदलांचा जरूर परिणाम होतो. वरील स्तरावरचे पुढारी जसे असतात, त्याप्रमाणे स्थानिक पुढाऱ्याच्या गटाला कमी जास्त महत्त्व येते. स्थानिक पातळीवरचे पुढारी राज्य स्तरावरील पुढाऱ्यांच्या मर्जीनुसार काम करतात."[९]

स्थानिक राजकारण : वर्ग व जात -

फलटण मतदारसंघातील स्थानिक राजकारणाचा विचार करीत असताना त्या राजकारणाला राजकीय संस्थांची पार्श्वभूमी आहे हे लक्षात येते. कारण, या संस्था म्हणजेच सत्ता केंद्रे. या सत्ताकेंद्रांचे नेतृत्व मिळविण्यासाठी सत्तास्पर्धा चालू असते आणि स्थानिक राजकारणावर बागायतदार शेतकरी वर्गाचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. त्यांना फलटणच्या व्यापारी वर्गाचा पाठिंबा आहे.[१०] वर्गीय पातळीवर विचार केला असता असे दिसते की, नाईक - निंबाळकर हे मूळचे सरंजामदार पण ते बागायतदारांचे व सधन शेतकऱ्यांचे प्रतिनिधी झाले. सरंजामदारीतून ते बाहेर पडले म्हणून त्यांच्याकडे गटाचे नेतृत्व आले. श्री. कदम, भोईटे, खर्डेकर हे

पुढारी सधन बागायतदार व शेतकरी वर्गाचेच पुढारी आहेत.

जातीय दृष्टया विचार केला तर फलटणमधील सर्व पुढारी मराठा जातीतील आहेत. यात धनगर, माळी वगैरे जमातींची संख्या व आर्थिक बळ बरेच असले तरी त्या जातीतील पुढाऱ्यांचा राजकारणावर फारसा प्रभाव नाही. शिवाय या अल्प संख्यांक जातींमध्ये परस्पर संघर्ष आहेत. त्यामुळे जातीदृष्टया मराठा जातीतील पुढाऱ्यांनी फलटणच्या राजकारणावर पूर्ण वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे. दलित व इतर मागास वर्गीय पुढारी फारसे काम करताना दिसत नाहीत. म्हणून फलटणच्या राजकाणावर जातींवर आधारलेला जातीवाद नाही. यामुळे जातीयवादाचा वापर करण्याची गरज गटांना भासत नाही.

थोडक्यात, सांगायचे झाले तर, फलटणच्या पक्षीय राजकारणावर गटबाजीचा जास्त प्रभाव आहे. सधन बागायतदार वर्ग व मराठा जात यातून सर्वच गटाचे पुढारी पुढे आलेले आहेत. सत्ता हा राजकारणाचा केंद्रबिंदू झाल्यामुळे तालुक्यातील राजकारणाचे आरोग्य बरेच दुषित झालेले आहे.

<u>संदर्भसूची - (प्रकरण चौथे)</u>


१· भोळे भा·ल· महाराष्ट्राचे राजकारण : पाव शतकाचा प्रवास, शिवाजी विद्यापीठातील झालेल्या सातव्या राजशास्त्र परिषदेमध्ये सादर केलेला शोधनिबंध, १९८५·

२· ओटी विद्याधर साखर सम्राटांचे राजकारण, चौथी महाराष्ट्र राज्यशास्त्र परिषद संगमेश्वर १९८२ येथे वाचलेला शोधनिबंध·

३· बाविसकर बि·एस· <u>पॉलिटीक्स ऑफ डेव्हलपमेंट शुगर को-ऑप· इन रुरल महाराष्ट्रा</u>, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, न्यु दिल्ली· १९८०·

४· श्री·शिवाजीराजे नाईक-निंबाळकर यांनी प्रश्नावलीला दिलेल्या उत्तरांमधून, १० जानेवारी १९८७·

५· डॉ·भोईटे यांनी दिलेल्या मुलाखतीमधून, २६ जानेवारी १९८७

६· श्री·चिमणराव कदम यांनी दिलेल्या मुलाखतीमधून, २ फेब्रुवारी ८७·

७· तत्रैव·

८· डॉ· कृष्णचंद्र भोईटे यांनी दिलेल्या मुलाखतीमधून, २६ जाने·८७·

९· श्री·शिवाजीराजे नाईक - निंबाळकर यांनी प्रश्नावलीला दिलेल्या उत्तरामधून १० जानेवारी १९८७·

१०· कार्टर अँन्थनी एलिट पॉलिटिक्स् इन रुरल इंडिया, विकास पब्लिकेशन हाऊस, न्यु दिल्ली, १९७५·